आपलं महानगर


# रोबोटिक्स अ‍ॅण्ड ऑटोमेशन क्षेत्रातील करिअर संधी

**कोविड–१९ च्या पूर्वी आणि त्यानंतर अशी तुलना आता बऱ्याच क्षेत्रामध्ये चालू आहे. कोविड–१९ या अदृश्य शत्रूचे बऱ्याच क्षेत्रावर वाईट परिणाम होत आहेत. भारतातील औद्योविक क्षेत्रापुढील महत्वाचे आव्हान म्हणजेच कुशल कामगार आणि भारतीय उत्पादनात प्रमाणित पद्धतीचा अभाव. तशी ही समस्या पूर्वीपासूनचीच आहे. पण, ती आता जास्त भयकर होईल. म्हणूनच बरेच उद्योजक मानवविरहित उत्पादनाचा विकल्प आधीपासनूच अमलात आणत होते. परंतु कोरोनानंतर कंपन्यांनी आपली सगळी संसाधने मानवविरहित उत्पादनाकडे वळवली तर त्यात नवल नाही. मानवविरहित उत्पादन म्हणजेच रोबिटिक्स अ‍ॅण्ड ऑटोमेशनचा उत्पादन प्रक्रियेत समावेश. याच उगवत्या क्षेत्राविषयी माहिती, संधी आणि आव्हाने सांगण्याचा हा प्रयत्न.**

रोबोटिक्स अ‍ॅण्ड ऑटोमेशन म्हणजेच हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर प्रणाली एकत्र करुन दुसऱ्या प्रक्रियांना नियंत्रित करणे. त्यामुळेच संपूर्ण मानविरहित किंवा माणसाच्या निगराणीत संपूर्ण प्रक्रिया कार्यान्वित होते. रोबिटिक्स अ‍ॅण्ड ऑटोमेशन हे अभियांत्रिकीचे असे एकमेव क्षेत्र आहे की, जिथे बरीच वैज्ञानिक, वैद्यकीय व तंत्रज्ञानाची क्षेत्र एकत्र भेटतात. म्हणूनच की काय, अलीकडच्या काळात लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत रोबिटिक्स अ‍ॅण्ड ऑटोमेशन हे सर्वांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. तसेच रोबोटिक्स अ‍ॅण्ड ऑटोमेशनच्या भविष्यातील संभाव्यतेविषयी अगदी आनंददायक आणि काही प्रमाणात उच्च अपेक्षा सुध्दा आहेत.




परंतु, जगाच्या तुलनेत भारतात अजूनही या क्षेत्रातील संशोधन कमीच आहे. त्यात दिवसेंदिवस लक्षणीय वाढ होताना दिसते. प्रत्येक एक हजार कामगारांमागे अमेरिकेत १८९ रोबोट, चीनमध्ये ६८ तर भारतात फक्त ३ रोबोटच वापरले जातात. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ रोबिटिक्स (आयएफआर) च्या अहवालानुसार भारतातील रोबोट स्थापनेचा दर २०२० मध्ये ३३ टक्के ने वाढून ६ हजार युनिटवर पोहचला आहे. तसेच भारत, तैवान या आशियायी देशांमध्ये यात सलग वाढ होत आहे. विल्स टॉवर वॉटसन या सर्वेनुसार भारतातील औद्योगिक कार्यक्षेत्रातील ऑटोमेशन १४ टक्के वरुन २७ टक्के पर्यंत २०१८ ते २०२० या कालावधीत वाढले आहेत. 'सीआयएमए'च्या सर्वेनुसार रोबोटिक्स अ‍ॅण्ड ऑटोमेशनच्या अंमलबजावणीत भारत जगार तीसऱ्या क्रमांकावर आहे. भारतात्तील रोबोट स्थापनेचा आलेख




सर्वकाही सांगतो.

जसा या क्षेत्राचा विस्तार होतोय तशी या क्षेत्रातील कुशल अभियंते, कारागीर यांचे गरजही वाढते आहे. इंडीड या कंपनीनुसार भारतातील रोबोटिक्स अ‍ॅण्ड ऑटोमेशनमधील नोकरीच्या जाहीरातींमध्ये १८६ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्र या नोकरीच्या संधीमध्ये अग्रेसर आहे. त्यापाठोपाठ कर्नाटक आणि तेलंगणा ही राज्ये आहेत. आज भारतात अंदाजे १४१ रोबोटच्या मोठ्या कंपन्या कार्यान्वित आहेत. त्यातील ४४ ग्राहक रोबोटिक्स, ६३ इंडस्ट्रियल रोबोटिक्स आणि ३४ कंपन्या रोबोटिक्स प्रोसेस ऑटोमेशन या क्षेत्रात काम करतात. विशेष म्हणजे त्यातील ६५ कंपन्या महाराष्ट्रात आहेत. फायकोन, मिलग्रोव, ओमनी प्रेझेन्ट रोबोटिक्स टेक्नॉलॉजी, क्रायटोग्राफ, टेक्नॉलॉजी आय फ्युचर रोबोटिक्स, अल्फा ३डी, रोबो लॅब, परी रोबोटिक्स इत्यादी खासगी तसेच सीएआयआर, डीआरडीओ, आयएसआरओ, डीआरडीएल इत्यादी पब्लिक सेक्टर नामवंत कंपन्या या क्षेत्रात काम करत आहेत. ऑटोमेटिव्ह, उत्पादन एफएमसीजी, धातू आणि उत्खनन, इलेक्ट्रॉनिक्स, आरोग्यसेवा, शेती इत्यादी रोबोटिक्स अ‍ॅण्ड ऑटोमेशन वापराची महत्वाची क्षेत्र आहेत. परंतु, याबरोबरच भारतात घरांचे ऑटोमेशन या क्षेत्रातही काम होणे बाकी आहे. या क्षेत्राची ६० टक्के बाजारपेठ भारतात शिल्लक आहे. या सगळ्या गोष्टींचा विचार करता रोबोटिक्स अ‍ॅण्ड ऑटोमेशन अभियांत्रिकी सारख्या स्पेशलाईस शाखा या बारावी विज्ञानच्या विद्यार्थ्यांसमोर अत्यंत चांगला पर्याय उपलब्ध आहे. रोबोटिक्स अ‍ॅण्ड ऑटोमेशन क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाची गरज पूर्ण करण्यासाठी आज तरुणांनी या महत्वाच्या क्षेत्राकडे वळून अपेक्षित कौशल्य विकसीत करणे अपेक्षित आहे.

– प्रा. नानासाहेब गरुळे व प्रा. संतोष सांगळे

**के. के. वाघ इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग एज्युकेशन अ‍ॅण्ड रिसर्च,अमृतधाम, पंचवटी**

**मो. ७५८८५५७२०३, ई–मेल:sbsangle@kkwagh.edu.in**

पुढारी

# वाघ अभियांत्रिकी, तंत्रनिकेतनला सर्वोत्कृष्ट प्लॅटिनम दर्जा प्रदान

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

दर्जेदार शिक्षणपद्धती आणि उद्योग-शिक्षण संस्थेतील संबंध यांवर आधारित भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) आणि भारतीय उद्योग संघ (CII) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सर्वेक्षणामध्ये के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय आणि के. के. वाघ तंत्रनिकेतनची नामांकित प्लॅटिनम इन्स्टिट्यूट म्हणून निवड करण्यात आली आहे.

यासाठी वर्ष २०२० मध्ये अर्ज मागविण्यात आले होते. त्याअंतर्गत भारतातील अनेक महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला होता. सर्वेक्षणानंतर सर्वोत्कृष्ट म्हणजे प्लॅटिनम, मध्यम म्हणजे गोल्ड आणि सामान्य दर्जाचे म्हणजे सिल्वर श्रेणी (स्टेट्स) महाविद्यालयांना प्रदान केले जातात.

देशातील ८१४ व्यावसायिक महाविद्यालये अंतिम सर्वेसाठी पात्र ठरली होती. यापैकी १८४ महाविद्यालयांची प्लॅटिनम दर्जासाठी निवड करण्यात आली आहे. सन २०१६, २०१७, २०१९ व २०२० या सलग चार वर्षांपासून के. के. वाघ अभियांत्रिकी आणि तंत्रनिकेतन या दोन्ही महाविद्यालयांची प्लॅटिनम इन्स्टिट्यूट म्हणून निवड केली जात आहे. याबाबतची माहिती अनुक्रमे प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर आणि प्राचार्य प्रकाश कडवे यांनी दिली.

महाविद्यालयाचा उद्योगसमूहांशी असलेला संवाद, उद्योगसमूहांना दिल्या जाणाऱ्या भेटी, नोकरी-इंटर्नशिपच्या संधी, उद्योगसमूहांच्या मदतीने शोधनिबंध, अभ्यासक्रम ठरविताना उद्योगसमूहांचा सहभाग व कुशल अभियंते बनवण्यासाठी महाविद्यालय कितपत सक्षम आहे, याची तपासणी केल्यानंतर प्लॅटिनम दर्जा दिल्याची डॉ. प्रमोद शहाबादकर यांनी दिली.

Nashik Edition
Jan 5, 2021 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# के. के. वाघ अभियांत्रिकीस प्लॅटिनम दर्जा प्रदान

**प्रतिनिधी** | नाशिक

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (एआयसीटीइ) आणि भारतीय उद्योग संघ (सीआयआय) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सर्वेक्षणात के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयास प्लॅटिनम इन्स्टिट्यूट म्हणून निवड करण्यात येऊन प्लॅटिनम दर्जा प्रदान करण्यात आला.

दरवर्षी एआयसीटीइ व सीआयआय यांच्या वतीने महाविद्यालयाच्या विविध उद्योग समूहांशी असलेल्या संवाद आणि त्याद्वारे आयोजित केले जाणारे विद्यार्थी उपयोगी उपक्रम यावर ऑनलाइन पद्धतीने सर्वेक्षण होते. यासाठी २०२० या वर्षात अर्ज मागवण्यात आले होते. सर्वोत्कृष्ट म्हणजे प्लॅटिनम, मध्यम म्हणजे गोल्ड आणि सामान्य दर्जाचे म्हणजे सिल्व्हर श्रेणी महाविद्यालयांना प्रदान केले जातात. देशातील ८१४ व्यावसायिक महाविद्यालयांपैकी ९८४ महाविद्यालयांची प्लॅटिनम दर्जासाठी निवड झाली. संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, विश्वस्त समीर वाघ, अशोक मर्चंट, सचिव प्रा. के. एस बंदी यांनी प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर, प्रकाश कडवे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

9-1-2021,Divya Marathi

मार्गदर्शन • उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांची माहिती

# शैक्षणिक संस्थांच्या विविध समस्या तातडीने मार्गी लावणार




के. के. वाघ संस्थेत राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत मार्गदर्शन करताना.

**प्रतिनिधी** | नाशिक

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप, फ्रीशिप व इतर शुल्क प्रतिपूर्ती, खासगी शिक्षण संस्थांना विद्युत शुल्क माफी, विद्यार्थ्यांच्या बस तिकिटात कपात तसेच, राज्यस्तरावर खेळणाऱ्या क्रीडापटूंना शासकीय सेवेत आरक्षण अशा शैक्षणिक संस्थांच्या विविध समस्यांवर सर्व संबंधित पदाधिकाऱ्यांची पुढील पंधरा दिवसांत मंत्रालयात बैठक घेत या समस्या मार्गी लावण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिले.

येथील के. के. वाघ शिक्षण संस्थेत मार्गदर्शनपर भाषणात सावंत बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. सामंत म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे अध्यक्षतेखाली नाशिक येथे राज्यस्तरीय चर्चासत्र भरविण्यात येईल. कोविड-१९ चा पार्श्वभूमीवर सर्व महाविद्यालय ऑफलाइन सुरू करण्याबाबत सॉपचा विचार करून निर्णय घेण्यात येईल, असेही ते म्हणाले. संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेव वाघ यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मनोगत व्यक्त केले. प्राचार्य के. एन. नांदूरकर यांनी महाविद्यालयांच्या विविध समस्यांची माहिती सादर केली. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन स्वाती पवार यांनी केले. याप्रसंगी विश्वस्त चांगदेव होळकर, समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, अजिंक्य वाघ, पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**Divya marathi, 24-1-2021**

आपलं महानगर

# शैक्षणिक संस्थांच्या समस्या लावणार मार्गी

## उच्च व तंत्रशिक्षण मंत्री सामंत यांची ग्वाही




**नाशिक** : मागासवर्गीय विद्यार्थ्यांना स्कॉलरशीप, फ्रिशिप व इतर शुल्क प्रतिपुर्ती, खासगी शिक्षण संस्थांना विद्युत शुल्क माफी, विद्यार्थ्यांच्या बस तिकीटात कपात तसेच, राज्यस्तरावर क्रिडापटूंना शासकीय सेवेत आरक्षण अशा शैक्षणिक संस्थांच्या विविध समस्यांवर सर्व संबंधित पदाधिकारी यांची पुढील १५ दिवसांत मंत्रालयात बैठक घेत या समस्या मार्गी लावण्याच प्रयत्न केला जाईल, अशी ग्वाही उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उद्य सामंत यांनी दिली.

कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्था, नाशिक येथे मार्गदर्शनपर भाषणात बोलत होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांचे हस्ते सत्कर करण्यात आला. या प्रसंगी विश्वस्त चांगदेवराव होळकर, समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, अजिंक्य वाघ, पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित उपस्थित होते. तसेच पुढे श्री. सामंत म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरणा अंतर्गत डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे अध्यक्षतेखाली नाशिक येथे राज्यस्तरीय चर्चा सत्र घेणार असल्याचे सांगितले.

# शैक्षणिक संस्थांच्या समस्या मार्गी लावू : ना. सामंत

**नाशिक : प्रतिनिधी**

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना स्कॉलरशीप, फ्रीशिप व इतर शुल्क प्रतिपुर्ती, खासगी शिक्षण संस्थांना विद्युत शुल्क माफी, विद्यार्थ्यांच्या बस तिकीटात कपात तसेच, राज्यस्तरावर खेळणा-या क्रीडापटूंना शासकीय सेवेत आरक्षण अशा शैक्षणिक संस्थांच्या विविध समस्यांवर सर्व संबंधित पदाधिकारी यांची पुढील १५ दिवसांत मंत्रालयात बैठक घेत या समस्या मार्गी लावण्याच प्रयत्न केला जाईल अशी ग्वाही महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.

के. के. वाघ शिक्षण संस्था येथे मार्गदर्शनपर भाषणात बोलत होते.




कार्यक्रमाची सुरवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांच्याहस्ते उदय सामंत यांचा पुष्पगुच्छ देत सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विश्वस्त चांगदेवराव होळकर, समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, अजिंक्य वाघ, पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित उपस्थित होते. तसेच पुढे सामंत म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरणा अंतर्गत डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे अध्यक्षतेखाली नाशिक येथे राज्यस्तरीय चर्चा सत्र घेणार असल्याचे सांगितले.

कोव्हीड-१९ चा पार्श्वभुमीवर सर्व महाविद्यालय ऑफलाइन सुरु करण्याबाबत SOP चा सारासार विचार करुन लवकरच निर्णय घेण्यात येईल, असेही ते म्हणाले. कर्मवीर काकासाहेब वाघ यांनी १९७० साली या संस्थेची स्थापना केली. गेल्या पाच दशकापासून ही संस्था शिक्षण क्षेत्रात मोलाचे योगदान देत आहे. असे गौरवोद्गार त्यांनी काढले. बाळासाहेब वाघ यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मनोगत व्यक्त केले.

प्राचार्य के. एन. नांदूरकर यांनी महाविद्यालयांच्या विविध समस्या आणि संस्थेबाबतची माहिती सादर केली. सूत्रसंचालन आणि स्वाती पवार यांनी आभार मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

**Gavkari, 23-1-2021**

पुढारी




**नाशिक : ना. उदय सामंत यांचा सत्कार करताना के. के. वाघ संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ.**

# शैक्षणिक संस्थांच्या समस्या मार्गी लावणार

**■ ना. उदय सामंत : के. के. वाघ संस्थेला भेट**

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

खासगी शिक्षण संस्थांना विद्युत शुल्कमाफी, विद्यार्थ्यांच्या बस तिकिटात कपात तसेच राज्य स्तरावर खेळणाऱ्या क्रीडापटूंना शासकीय सेवेत आरक्षण अशा शैक्षणिक संस्थांच्या विविध समस्यांवर पुढील पंधरा दिवसांत मंत्रालयात बैठक घेत त्या मार्गी लावण्याचा प्रयत्न करेल, अशी ग्वाही उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.

के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या भेटीप्रसंगी ते बोलत होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांच्या हस्ते उदय सामंत यांचा पुष्पगुच्छ देत सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विश्वस्त चांगदेवराव होळकर, समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, अजिंक्य वाघ, पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पुढे सामंत म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक येथे राज्यस्तरीय चर्चासत्र घेणार असल्याचे सांगितले. प्राचार्य के. एन. नांदूरकर यांनी संस्थेबाबतची माहिती दिली. स्वाती पवार यांनी सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले.

Nashik Edition
Jan 24, 2021 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# शैक्षणिक संस्थांच्या समस्या मार्गी लावणार

## उदय सामंत : के. के. वाघ शिक्षणसंस्थेला सदिच्छा भेट

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप, फ्रीशिप व इतर शुल्क प्रतिपूर्ती, खासगी शिक्षण संस्थांना विद्युत शुल्क माफी, विद्यार्थ्यांच्या बस तिकिटात कपात, तसेच राज्यस्तरावर खेळणाऱ्या क्रीडापटूंना शासकीय सेवेत आरक्षण, अशा शैक्षणिक संस्थांच्या विविध समस्या आहेत. या समस्या संबंधित शैक्षणिक संस्था पदाधिकारी यांची लवकरच मंत्रालयात बैठक घेऊन मार्गी लावण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली.

शहरातील के. के. वाघ शिक्षणसंस्था येथील सदिच्छा भेटीप्रसंगी ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांच्या हस्ते सामंत यांचा पुष्पगुच्छ देत सत्कार करण्यात आला. यावेळी विश्वस्त चांगदेवराव होळकर, समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, अजिंक्य वाघ आदी उपस्थित उपस्थित होते. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्व महाविद्यालये ऑफलाइन सुरू करण्याबाबत एसओपीचा सारासार विचार करून लवकरच निर्णय घेण्यात येईल. नवीन शैक्षणिक धोरणाअंतर्गत डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक येथे राज्यस्तरीय चर्चासत्र घेणार असल्याचे सामंत यांनी सांगितले. कर्मवीर काकासाहेब वाघ यांनी १९७० मध्ये या संस्थेची स्थापना केली. गेल्या पाच दशकांपासून ही संस्था शिक्षणक्षेत्रात मोलाचे योगदान देत आहे, असे गौरवोद्गार शिक्षणमंत्री सामंत यांनी काढले. संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मनोगत व्यक्त केले. प्राचार्य के. एन. नांदूरकर यांनी महाविद्यालयांच्या विविध समस्या आणि संस्थेबाबतची माहिती सादर केली. स्वाती पवार यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.



**नाशिक : के. के. वाघ शिक्षणसंस्थेच्या बैठकीत बोलताना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत.**

My Nashik Edition
Jan 25, 2021 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

# माजी विद्यार्थ्यांकडून ऋणानुबंधाची गुरुदक्षिणा



## के. के. वाघ शिक्षण संस्थेत मेळावा

म. टा. वृत्तसेवा, नाशिकरोड

संस्कार, आत्मविश्वास, नैतिकतेचे धडे, सकारात्मक दृष्टीकोन आणि स्वावलंबन या पंचसूत्रींची मिळालेल्या शिदोरीच्या बळावरच समाजात आपण आदर्श नागरिकत्त्वाचे धडे गिरवत आहोत, अशी गौरवोद्‌गाररुपी गुरुदक्षिणा के. के. वाघ विद्याभवनच्या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांना नुकतीच दिली.

के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यालयात के. के. वाघ विद्याभवन, गीताई कन्या विद्यालय, भाऊसाहेब नगर, के. के. वाघ विद्याभवन, पिंपळस रामाचे या तिन्ही शाळांचा माजी विद्यार्थी मेळावा ऑनलाइन स्वरुपात झाला. संस्थाध्यक्ष बाळासाहेब वाघ, विश्वस्त शकुंतला वाघ, समीर वाघ, अजिंक्य वाघ, प्राचार्य डॉ. नांदुरकर, शरद गाडे, जयश्री पानगव्हाणे, चंद्रकांत कुशारे, डॉ. मनोज झाडे, डॉ. भूषण कर्डिले यांची उपस्थिती होती. या मेळाव्यात सुमारे साडेसहाशे विद्यार्थी आणि माजी शिक्षकांनी सहभाग घेतला.

## निवृत्त शिक्षक, सेवकांचा सत्कार

कार्यक्रमात संस्थेतून निवृत्त झालेल्या शिक्षक आणि सेवकांचा बाळासाहेब वाघ यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य शरद गाडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. वाय. के. ढगे, स्वाती पवार यांनी सूत्रसंचालन केले. चंद्रकांत कुशारे यांनी आभार मानले.

पुढारी



पिंपळगाव बसवंत : के. के. वाघ विद्याभवन येथे माजी विद्यार्थी मेळाव्यात बोलताना प्राचार्य चंद्रकांत कुशारे. समवेत बाळासाहेब वाघ, समीर वाघ, शकुंतला वाघ, अजिंक्य वाघ, डॉ. केशव नांदूरकर आदी. (छाया : हेमंत थेटे)

# वाघ संस्थेचा माजी विद्यार्थी मेळाव्यात देश-विदेशातून विद्यार्थ्यांचा सहभाग

**पिंपळगाव बसवंत : पुढारी वृत्तसेवा**

पिंपळस येथील के. के. वाघ विद्या भवन, भाऊसाहेबनगर येथील गीताई वाघ कन्या विद्यालय व के. के. वाघ विद्याभवन येथील तीन अनुदानित शाळांचा ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने माजी विद्यार्थी मेळावा संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांच्या अध्यक्षतेखाली झाला. प्रमुख पाहुणे म्हणून विश्वस्त समीर वाघ, शकुंतला वाघ, अजिंक्य वाघ, डॉ. केशव नांदूरकर उपस्थित होते.

संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभाच्या निमित्ताने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्यात सुमारे दीड हजार माजी विद्यार्थ्यांनी ऑनलाइन, तर दीडशे विद्यार्थ्यांनी ऑफलाइन सहभाग नोंदविला.

यावेळी विद्यार्थांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. भाऊसाहेबनगर येथील शाळेचे अनेक विद्यार्थी सनदी अधिकारी, डॉक्टर, इंजिनिअर म्हणून देशभर सेवा देत आहेत. या सर्व विद्यार्थ्यांनी खास वेळ काढत शाळेतील आठवणींना उजाळा दिला. यावेळी सर्वांच्या योगदानामुळेच के. के. वाघ शिक्षण संस्थेचे नाव उज्ज्वल झाल्याचे मत अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांनी व्यक्त केले. प्राचार्य चंद्रकांत कुशारे यांनी मेळाव्याचे सूत्रसंचालन केले. डॉ. संजय कदम, डॉ. विलास कांगणे, डॉ. राहुल घायाळ, अनुपमा कापडी, विजया वैरागकर, डॉ. प्रवीण ढाके, डॉ. पंकज भालेराव, श्रद्धा पानगव्हाणे, कल्पना गांगोडे, अभिजित निळ या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. माजी प्राचार्य रवींद्र मोरे, शंकरराव गायकवाड, उलका कुरणे, सी.ए. शेख, मंदाकिनी पवार, अनुराधा घोडके यांनी मार्गदर्शन केले. मेळावा यशस्वीतेसाठी संस्थेचे सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य चंद्रकांत कुशारे, मुख्याध्यापिका जयश्री पानगव्हाणे, मुख्याध्यापक शरद गाडे, गुरुकुल अधीक्षक श्रीकांत ढवळे, मनोज झाडे, संजय गिते, उज्ज्वला ठोंबरे, जयश्री जाधव, आदींनी विशेष परिश्रम घेतले.

My Nashik Edition
Jan 16, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

लोकमत

# शिष्यवृत्ती, शुल्क प्रतिपूर्तीविषयी १५ दिवसात तोडगा : सामंत

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक** : मागासवर्गीय विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप, फ्रीशिप व इतर शुल्क प्रतिपूर्ती, खासगी शिक्षण संस्थांना विद्युत शुल्क माफी, विद्यार्थ्यांच्या बस तिकिटात कपात तसेच राज्यस्तरावर खेळणाऱ्या क्रीडापटूंना शासकीय सेवेत आरक्षण अशा शैक्षणिक संस्थांच्या विविध समस्यांवर सर्व संबंधित पदाधिकारी यांची पुढील पंधरा दिवसांत मंत्रालयात बैठक घेत या समस्या मार्गी लावण्याचे आश्वासन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिले आहे.

नाशिक दौऱ्यात उदय सामंत यांनी शुक्रवारी (दि.२२) के.के. वाघ शिक्षण संस्थेत शिक्षक व संस्थांचालकांना मार्गदर्शन केले. व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, विश्वस्त चांगदेव होळकर, समीर वाघ, सचिव प्रा. के.एस. बंदी, अजिंक्य वाघ आदी उपस्थित होते. नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक येथे राज्यस्तरीय चर्चासत्र घेणार असल्याचेही यावेळी सामंत यांनी सांगितले. कोविड-१९च्या पार्श्वभूमीवर सर्व महाविद्यालय ऑफलाइन सुरू करण्याबाबत मानक कार्यपद्धतीचा (एसओपी)चा सारासार विचार करून लवकरच निर्णय घेण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## जेथे मराठी माणूस तेथे पोहोचेल मुक्त विद्यापीठ

देशात मराठी माणूस जेथे असेल तेथे मुक्त विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करून शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. गोवा राज्यात याबाबतचा पायलट प्रोजेक्ट राबविला जाणार असल्याचे राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. सामंत यांनी शुक्रवारी मुक्त विद्यापीठ तसेच पुणे विद्यापीठाच्या विभागीय कार्यालयाच्या कामकाजाचा आढावा घेतला.



विद्यापीठ उपकेंद्राच्या जागेची पाहणी करताना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत. समवेत हेमंत गोजसे, डॉ. प्रफुल्ल पवार, एम. रासवे, डॉ. प्रशांत टोपे, आर. व्ही. पाटील, अमित पाटील, डॉ. नंदू पवार, साईनाथ दुर्गे आदी.

## विद्यापीठ उपकेंद्राचे काम तत्काळ सुरु होणार

दीर्घकाळापासून रखडलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक उपकेंद्राच्या बांधकामाला सुरुवात होऊन या कामाला गती मिळावी, यासाठी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी (दि. २२) शिवनई येथील विद्यापीठ उपकेंद्राच्या जागेची पाहणी केली. तसेच उपकेंद्राच्या कामाला शासनाकडून मान्यता मिळाल्याचे स्पष्ट करीत उपकेंद्र व संरक्षक भिंतीच्या कामाला सुरुवात करण्याचे निर्देश दिले आहेत. या कामासाठी एप्रिल महिन्यात निविदा मागवण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

Nashik Main
Page No. 7 Jan 23, 2021
Powered by: erelego.com

# के. के. वाघ कॉलेजमध्ये रोबोटिक्सवर चर्चासत्र

**नाशिक** : आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात प्रत्येक क्षेत्रात रोबोटिक्स व ऑटोमेशनचा वापर वाढत असल्याने नवीन व्यवसायासह रोजगार निर्माण होत आहे. के. के. वाघ इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये त्याच अनुषंगाने 'रोबोटिक्स' व 'ऑटोमेशन' या विषयावर चर्चासत्र पार पडले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी केले.

18-1-2021, Maharashtra Times

सकाळ

# राज्याच्या सीमावर्ती भागात मुक्त विद्यापीठाचा विस्तार

## उदय सामंत : एप्रिलपासून नाशिक उपकेंद्राचे कामकाज

**सकाळ वृत्तसेवा**

**नाशिक, ता. २२ : राज्याच्या सीमावर्ती भागात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा विस्तार होणार आहे. प्रायोगिक तत्त्वावर गोवा आणि कर्नाटकच्या सीमावर्ती भागात चंदगड, तुमडी आणि म्हैसाळ येथे विद्यापीठाचे केंद्र सुरू होणार असल्याने राज्याबाहेरील मराठी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय होणार असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.**

मुक्त विद्यापीठाच्या नाशिक उपकेंद्राच्या जागेची पाहणी करण्यासाठी श्री. सामंत नाशिकच्या दौऱ्यावर होते. त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात विद्यापीठाच्या अडचणीच्या अनुषंगाने बैठक घेतली. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. श्री. सामंत म्हणाले, की मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी गेल्या फेब्रुवारीत नाशिकला उपकेंद्रासाठी सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते. मात्र मध्यंतरी लॉकडाउनमुळे रखडलेल्या उपकेंद्राच्या जागेची पाहणी केली आहे. त्यात, ग्रामस्थांच्या रस्त्याची अडचण होती. त्याबाबत रस्त्याचे आश्वासन दिल्याने बाधितांचा प्रश्न मार्गी लागणार आहे. निविदेसह इतर प्रक्रिया पूर्ण करीत येत्या १५ एप्रिलपासून नाशिकच्या उपकेंद्राच्या कामकाजाला सुरवात होईल. साधारण दोन कोटी रुपये खर्चाच्या इमारत बांधकामाचा हा विषय दीड वर्षात मार्गी लागेल.

दरम्यान, मुक्त विद्यापीठाचा राज्याच्या बाहेर विस्तार करण्याचे बैठकीत ठरले. त्यानुसार प्रायोगिक तत्त्वावर गोवा आणि कर्नाटक राज्याच्या सीमावर्ती भागात मुक्त विद्यापीठाचे केंद्र सुरू करण्याचा निर्णय झाला. पुढच्या टप्प्यात दिल्ली, चेन्नई, हैदराबाद आदी शहरांत मुक्त विद्यापीठाचे अभ्यासक्रम सुरू होतील. याशिवाय रत्नागिरी, मुंबई, ठाणे, रायगड येथील उपकेंद्राला सुरवात होईल. त्यानंतर पदवीपर्यंतच नव्हे, तर किमान कौशल्यविषयक कोर्स सुरू होतील. नागपूरला साडेपाच कोटी रुपये खर्चून मुक्त विद्यापीठाचा विस्तार केला जाणार आहे. तेथे नवीन इमारतीसह विस्तार होईल.



**जिल्हाधिकारी कार्यालय : शुक्रवारी झालेल्या बैठकीत बोलताना उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत. शेजारी जिल्हाधिकारी सूरज मांढरे, कुलगुरू डॉ. नितीन करमळकर आदी.**

### बीएस्सी ॲग्रिकल्चरची सोय

यूजीसीच्या मान्यतेअभावी देशातील विविध विद्यापीठांचे ॲग्रिकल्चरचे पदवी अभ्यास बंद आहेत. मात्र, मुक्त विद्यापीठातर्फे बीएस्सी ॲग्रिकल्चरच्या पदवीची सोय करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी लवकरच राज्य मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन हे शिक्षण सुरू करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### सामंत म्हणाले...

- विद्यापीठातील शिक्षकेतरांना सातवा वेतन आयोग
- ऑनलाइन परीक्षेसह इतर गैरव्यवहाराची चौकशी
- मुक्त विद्यापीठाच्या पीएच.डी. संशोधनाला गती देणार
- मनपाच्या सगळ्या रुग्णालयांचे फायर ऑडिट पूर्ण

### महाविद्यालये लवकरच सुरू

**म्हसरूळ :** कोरोनाचा अजून समूळ नायनाट झालेला नसला तरी महाविद्यालये सुरू करणेदेखील महत्त्वाचे आहे. त्यामुळे राज्यभरातील महाविद्यालये लवकरच होतील, असे संकेत श्री. सामंत यांनी दिले. पंचवटीतील के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयात भेटीप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्ष बाळासाहेब वाघ, विश्वस्त चांगदेव होळकर, मिलिंद मुरुगकर, एस. एम. साने, अजिंक्य वाघ, सचिव के. एस. बंदी, प्राचार्य पी. टी. कडवे, के. एन नांदुरकर, मुंबई शिक्षण मंडळाचे सदस्य साईनाथ धुर्वे, सिनेट सदस्य अमित पाटील, चांडवडकर आदी या वेळी उपस्थित होते.

आपलं महानगर



# K. K. Wagh Education Society, Nashik

**Central Office:** Hirabai Haridas Vidyanagari, Amrutdham, Panchavati, **NASHIK**-422003.
**Ph. No.** (0253) 2221106, 2221111, 2221120 **Fax**: (0253) 2518870
**Email Id:** disp-co@kkwagh.edu.in **Website:** www.kkwagh.edu.in

✓ Quality Education ✓ Good Placement

## Registration for Institute Level

# ADMISSIONS OPEN

## ENGINEERING COLLEGE

(Eight branches accredited by NBA, New Delhi, NAAC 'A' grade)

**Name of Course**

**Under Graduate Courses (First Year Engineering)**

- Computer Engineering
- Electronics & Telecommunication
- Civil Engineering
- Mechanical Engineering
- Electrical Engineering
- Chemical Engineering
- Information Technology
- Artificial Intelligence & Data Science
- Robotics & Automation Engineering

**Post Graduate Courses**

- MBA
- MCA
- ME : (Civil, Electrical & E&TC)

**Register Online:** tinyurl.com/kkwadmission
**Website:** https://engg.kkwagh.edu.in
**Email Id:** admission2020@kkwagh.edu.in
**Contact:** Mr. Shirode: 7888045550, (0253) 2221310, 2512876

## POLYTECHNIC, NASHIK

(Four branches accredited by NBA, New Delhi)

- Computer Technology
- Civil Engineering
- Electrical Engineering
- Chemical Engineering
- Mechanical Engineering
- Information Technology
- Electronics & Telecommunications
- Advanced Diploma in Industrial Safety (IT)*

*One year Non-AICTE course

**Register online** : tinyurl.com/y6e3zepx
**Website** : https://poly.kkwagh.edu.in
**Email id** : srshinde@kkwagh.edu.in
**Contact** : Mr. Gaikwad: 9970851899 / Mr. Jadhav: 7350561717

## AGRICULTURE & ALLIED COLLEGES

- College of Agricultural Engineering & Technology
- College of Agriculture
- College of Agricultural Bio-technology
- College of Food Technology
- College of Agriculture Business Management
- College of Horticulture

**Register Online** : tinyurl.com/yyze49nb
**Website** : https://agri.kkwagh.edu.in
**Email id** : principal-btechfood@kkwagh.edu.in
**Contact** : Mr. Nikam: 9822260250, (0253) 2555223

## PHARMACY COLLEGE

### B. PHARMACY

### D. PHARMACY

**Website** : https://pharmacy.kkwagh.edu.in
: https://dpharmacy.kkwagh.edu.in
**Email id** : principal-bpharmacy@kkwagh.edu.in
: principal-dpharmacy@kkwagh.edu.in
**Contact** :
**For B. Pharm** : Dr. S. P. Narkhede : 8446231031
**For D. Pharm** : Prof. R. A. Herole : 9764857838

## वैशिष्ट्ये:

- गेली ५० वर्षे शिक्षण क्षेत्रात कार्यरत असणारी नामवंत शिक्षणसंस्था.
- सध्या के.जी.पासून पि.एच.डी पर्यंत विविध शाखांमधील गुणवत्तापूर्ण शिक्षणाची सोय उपलब्ध.
- NBA ॲक्रीडिटेड तंत्रशिक्षण व अभियांत्रिकी शिक्षण प्रदान करणारी नामांकित संस्था.
- महाराष्ट्र स्तरावतील सर्वोत्कृष्ट तंत्रनिकेतनचा पुरस्कार प्राप्त तंत्रनिकेतन.
- विद्यापीठ स्तरावर दैदिप्यमान निकालाची परंपरा, अनेक विद्यार्थ्यांना सुवर्णपदक प्राप्त झाले आहे.
- सर्वाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारी संस्था.
- ६ विविध विद्याशाखांमध्ये कृषी शिक्षण प्रदान करणारी महाराष्ट्रातील सर्वात मोठी संस्था.
- विद्यार्थी विकास केन्द्रीत शिक्षणावर भर देणारी संस्था.